# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.01.2026** **वार:सोमवार**

---

1. राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आणण्याच्या उद्देशानं मुख्यमंत्री जागतिक आर्थिक मंच परिषदेत सहभागी होणार
2. भारताला शस्त्र सामग्री उत्पादनाचं जागतिक केंद्र बनवण्याचं उद्दिष्ट असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचं नागपुरात प्रतिपादन
3. 'बजाज पुणे ग्रँड टूर' या सायकल स्पर्धेचा आजपासून पुणे जिल्ह्यात थरार
4. प्रजासत्ताक दिन सोहळ्यात महाराष्ट्राचा 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचं प्रतीक' चित्ररथ सहभागी आणि
5. 50 षटकांच्या मालिकेत न्यूझीलंडचा भारतावर विजय

**<u>मुख्यमंत्री-दावोस</u>**

राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आणण्याच्या उद्देशानं जागतिक आर्थिक मंचाच्या आज स्वित्झर्लंडमधील दावोस इथं सुरू होत असलेल्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल दावोसला पोहोचले. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचं शिष्टमंडळही मुख्यमंत्र्यांसमवेत आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, प्रल्हाद जोशी आणि के. राममोहन नायडू यांच्यासह आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम आणि झारखंडचे मुख्यमंत्री विविध देशांच्या गुंतवणूकदारांसमोर आपापल्या राज्यांचे सादरीकरण करतील.

या दौऱ्यादरम्यान, जागतिक औद्योगिक नेते, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट परकीय गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. दरम्यान, स्वित्झर्लंडमधील झ्युरिक येथील बृहनमहाराष्ट्र मंडळात मुख्यमंत्र्यांचं स्वागत करण्यात आलं. येथील मराठी समुदायाशी संवाद साधताना, येथील मराठी बांधव हे विदेशातील महाराष्ट्राचे राजदूत आहेत असे गौरवोद्गार त्यांनी काढले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले......

**मला असं वाटतं की एक प्रकारे तुम्ही वेगवेगळ्या देशातले महाराष्ट्राचे आणि मराठीचे राजदूत आहात. तुम्ही या ठिकाणी आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आपली भाषा याचा एक परिणाम हा तयार करता त्या त्या देशाच्या संस्कृतीमध्ये त्या त्या देशाच्या व्यवसायामध्ये जे काही कार्य केलेलं आहे. त्यामुळे निश्चितपणे आम्हालाही त्याचा फायदा मिळतो आणि एक प्रकारे आपल्या सगळ्यांचा जो कंडक्ट आहे आपल्या सगळ्यांचं जे वागणं आहे. तो आमच्याकरता एक पासपोर्ट तयार होतो, की आपल्याला भारतात कुठे जायचं आहे, तर आपल्याला महाराष्ट्रात जायचं आहे कारण मराठी माणूस हा एंटरप्राइजिंग आहे. मराठी माणूस हा वेलकमिंग आहे मराठी माणूस हा मेहनती आहे. अशा पद्धतीनं आपल्या सगळ्या मराठी माणसाची एक प्रतिमा ही तुम्ही परदेशामध्ये या ठिकाणी तयार केली आहे आणि म्हणून तुमचे अतिशय मनापासून आभार मानतो.**

जागतिक व्यासपीठावर भारताचे विकास इंजिन म्हणून 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अधिक बळकट करण्याचा निर्धार असून, महाराष्ट्राची 1 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल अधिक वेगवान करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. गेल्या वर्षी महाराष्ट्राने 16 लाख कोटींचे गुंतवणूक करार केले होते. यावर्षी अधिक गुंतवणूक आणण्याचं उद्दिष्ट राज्य शासनाने ठेवले असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं.

**राजनाथसिंह**

देशाला संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नागपूरमध्ये बोलताना केलं. सिंह यांच्या उपस्थितीत, शिवा-सावंगा परिसरात स्थापन केलेल्या मध्यम क्षमता दारुगोळा सुविधा केंद्रात पिनाका गायडेड रॅकेटचं पाहिलं उत्पादन पाठवण्यात आलं. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना राजनाथ सिंह म्हणाले....

**डिफेंस मिनिस्टर के रूप में मुझे लगता है कि हम सही दिशा में आगे बढ़ रहे हैं और साथियों जब मैं किसी प्राइवेट सेक्टर यूनिट के इस स्तर पर काम करते हुए देखता हूं तो मुझे सिर्फ कोई यूनिट या कोई फैसिलिटी ही नहीं दिखती बल्कि मुझे एक नया संकल्प दिखता है। एक नया जोश दिखता है, एक नई ऊर्जा दिखती है और साथ ही साथ जो मैंने देखा है इनोवेशन नवाचार भी है और डिफेंस सेक्टर को हम सब आत्मनिर्भर बनाना चाहते हैं। हमारे प्रधानमंत्री जी बारबार इसका आग्रह करते हैं।**

**पुणे ग्रॅण्ड टूर**

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या 'बजाज पुणे ग्रँड टूर' या सायकल स्पर्धेचा थरार आजपासून पुणे जिल्ह्यात रंगणार आहे. जगभरातल्या 35 देशांतले 29 संघांचे 171 आघाडीचे सायकलपटू यात भाग घेणार आहेत. पुणे जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकारनं, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचं आयोजन केलं आहे.

स्पर्धेचा पहिला टप्पा आज दुपारी पुण्यातील गुडलक चौकातून सुरू होईल; आणि पुण्याच्या 9 तालुक्यांमधून आणि 150 गावांतून सायकलपटू मार्गक्रमण करत, येत्या 21 तारखेला, पुण्यातील डेक्कन जिमखाना बस स्थानकावर या टप्प्याचा समारोप होणार आहे. 437 किलोमीटरच्या या सायकल शर्यतीसाठी अद्ययावत रस्ते, सुरक्षा यंत्रणा, आणि सर्व आवश्यक सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. या शर्यतीचा मार्ग दख्खनचं पठार आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून जातो. या स्पर्धेच्या माध्यमातून पुण्याचा सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्थळं आणि ग्रामीण पर्यटनाचं दर्शन घडवलं जाणार आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या देश-विदेशातील सायकलपटूंच्या स्वागतासाठी आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

सासवड-बारामती मार्गावर पुण्यातील प्रसिद्ध क्रीडा संघटक आणि सायकलप्रेमी अनिरुद्ध देशपांडे यांनी स्पर्धकांच्या स्वागतासाठी 6 मीटर उंच आणि 12 मीटर रुंद सायकलची भव्य प्रतिकृती उभारली आहे. बोपदेव घाटातली सायकलची ही भव्य प्रतिकृती रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांचं लक्ष वेधून घेत आहे.

**वाहतूक बदल**

पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर आज, फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्ता, शहराच्या मध्यभागातले रस्ते आणि त्यांना जोडणारे उपरस्ते सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत बंद राहणार आहेत. त्यामुळे आज या मार्गावरच्या शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. स्पर्धा मार्गावरच्या खासगी कार्यालयातल्या कर्मचाऱ्यांनी आणि व्यावसायिकांनीही शक्यतो मेट्रो सेवेचा वापर करावा असं आवाहन पुणे पोलिसांनी केलं आहे.

**महाराष्ट्र चित्ररथ**

77व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राजधानी नवी दिल्लीत होणाऱ्या संचलनात यंदा महाराष्ट्राचा चित्ररथही सहभागी होणार आहे. 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचं प्रतीक' ही राज्याच्या चित्ररथाची संकल्पना आहे. यातून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचं दर्शन घडवलं जाणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजं पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचं प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण ओळख असलेल्या ढोल-ताशा पथकाच्या सादरीकरणातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेशही दिला जाईल. केंद्र सरकारच्या कार्यक्रमांची उत्कृष्ट

अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांना या वर्षीच्या प्रजासत्ताकदिन सोहोळ्यात विशेष आमंत्रण देण्यात आलं आहे. जळगाव जिल्ह्यातील पहूरपेठ चे लोकनियुक्त सरपंच अब्बु तडवी यांचा त्यात समावेश आहे.

**पुणे-जि.प.निवडणूक**

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकांमध्येही आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस-अजित पवार गटाबरोबर एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे, असं राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काल स्पष्ट केलं. महापालिका निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर ते बारामतीत पत्रकारांशी बोलत होते. दरम्यान, आगामी जिल्हा परिषद निवडणूक देखील समविचारी पक्षांना सोबत घेवून लढणार असल्याचं कांग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं. मात्र, कोणत्याही परिस्थिती भाजप, शिवसेना आणि घड्याळ चिन्ह असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासोबत जाणार नसल्याचंही सपकाळ यांनी स्पष्ट केलं.

**शेकोटी साहित्य संमेलन-नाशिक**

चौथं अखिल भारतीय शेकोटी लोककला साहित्य संमेलन नुकतंच नाशिकमध्ये पार पडलं. ज्येष्ठ साहित्यिक अलका दराडे यांच्या हस्ते या संमेलनाचं उद्घाटन करण्यात आलं. शहरी आणि ग्रामीण भागात प्राचीन लोककलेचा विसर पडत चालल्याची खंत दराडे यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी,कवी राजू देसला यांना,प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक महेश मांजरेकर आणि अभिनेते भरत जाधव यांच्या हस्ते 'समीक्षक म. सु. पाटील' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

**निधन-राज पुरोहित**

माजी मंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते राज पुरोहित यांचं काल मुंबईत प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झालं. ते 71 वर्षांचे होते. आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात नगरसेवक पदापासून केलेल्या पुरोहित, 25 वर्ष आमदार होते. हे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान काल इंदौर मध्ये खेळल्या गेलेल्या एक दिवसीय सामन्यात न्यूझीलंड संघाने भारताचा 41 धावांनी पराभव करत एक दिवसीय सामन्यांची मालिका 2-1 अशी जिंकली. मालिकेतील तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात, न्यूझीलंड संघाने दिलेल्या 338 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाने 46 षटकांत 296 धावा फटकावल्या. विराट कोहलीने सामन्यात शतक झळकावलं. भारताची सुरुवात अडखळत झाली. पहिल्या 13 षटकांत संघाने 4 गडी गमावले. न्यूझीलंडच्या डेरील मिचेलला सामनावीर तसंच मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आलं.

**हवामान**

संपूर्ण राज्यात आज हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.